'A' Grade
NAAC Re-accredited

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र व राजर्षी शाहू महाराज अध्यासन केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

# शिवकालीन शेती, जलव्यवस्थापन आणि वर्तमान संदर्भ

दिनांक : २४ व २५ मार्च २०१७



# ४१

# जलव्यवस्थापन : राजर्षी शाहुकाळ आणि वर्तमान संदर्भ

**डॉ. सविता सुक्ते**

वनस्पती विभाग, बलभीम कॉलेज, बीड

**प्रस्तावना :**

भारताच्या इतिहासात ज्या थोर विभूती होऊन गेल्या त्यात राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. राजर्षी शाहू महाराजांचे व्यक्तीमत्व हे असामान्य होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श त्यांनी नेहमी आपल्या नजरेसमोर ठेवला. राज्य हे प्रजेच्या कल्याणासाठी निर्माण करावयाचे असते आणि हे कल्याण प्रजेतील सर्व थरातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

**शाहू महाराजांची जलनीती:**

१) शाहू महाराजांनी राज्यकारभार करण्यास सुरू केल्यानंतर जनतेच्या अडी - अडचणी लक्षात घेऊन त्यांचे कल्याण करण्याच्या उद्देशाने २ एप्रिल १८९४ मध्ये एक जाहीरनामा काढला. राज्य कल्याणाची हमी देणारा हा जाहीरनामा होता.

२) इ.स.१९०२ मध्ये दुष्काळावर मात करण्यासाठी शाहू महाराजांनी जलसिंचन धोरण जाहीर केले. त्यानुसार एरिगेशन ऑफिसरची नेमणूक केली तसेच संस्थानातील सर्व लहान-मोठ्या तळयांची, विहिरींची गणना करण्याचे काम त्यांच्यावर सोपविले.

**जलनीतिचा प्रवास :**

शाहू महाराजांनी १९०२ मध्ये युरोप प्रवास केला. या प्रवासात युरोपियन लोकांनी केलेल्या भौतिक प्रगतीने ते प्रभावित झाले होते. युरोपातील धरणे पाहून आपल्या राज्यातही अशी धरणे का नसावीत असे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. सह्याद्रीच्या माथ्यावर प्रचंड पाऊस पडतो आणि तेथून उगम पावणाऱ्या नद्या पावसाळ्यात दुथडी भरून वाहतात. प्रचंड जलसंपत्ती समुद्रात नेऊन ओततात. पावसाळी संपला की त्या नद्या कोरड्या पडू लागतात. सह्याद्रीत कोसळणारे पावसाचे पाणी देशातील कोरड्या जमिनीस दिले गेले तर ही भूमि खऱ्या अर्थाने सुजलाम, सुफलाम होईल असा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला होता.